## <u>निशाणी क्र. ८८ वरील आदेश</u>

प्रस्तुतचा अर्ज अपीलकार यांनी उत्तरवादी क्र.८ कृष्णकुमार भगवान परूळेकर यांचे वारसांविरूध्द् झालेला अबेटमेंटचा आदेश रद्‌दबातल होवून मिळणेसाठी दाखल केला आहे.

त्यांच्या म्हणण्यानुसार प्रस्तुत अपीलातील उत्तरवादी क्र.८ हे दि. ३०/०१/२०१६ रोजी गोवा मेडीकल कॉलेज हॉस्पीटल बांबोळी येथे मयत झाले. मयत उत्तरवादी क्र.८ यांचे वारस मुदतीत दाखल करणे आवश्यक होते. परंतु, अपीलकार हे वयोवृध्द् ८० वर्षाचे असल्याने आणि त्यांचे काही लक्षात राहत नसल्याने त्याबाबत काहीच माहिती त्यांचे वकिलांना कळविली नाही. तसेच उत्तरवादी हे बांबोळी गोवा येथे मयत झाल्याने त्यांचा मृत्यु दाखला त्यांना वेळेत प्राप्त झाला नाही. त्यामुळे मयत उत्तरवादी क्र.८ चे वारस मुदतीत दाखल करणेस त्यांना विलंब झालेला आहे. सदरचा विलंब हा त्यांच्या निष्काळजीपणा अगर हलगर्जीपणामुळे झालेला नाही. सदर विलंब माफ न झाल्यास अपीलकार यांचे पैशाच्या स्वरूपात कधीही न भरून येणारे अपरिमित असे नुकसान होणार आहे. त्यामुळे वारस दाखल करणेस विलंब होवून त्यांचेविरूध्द् झालेला अबेटमेंटचा आदेश रद्‌दबातल होवून मिळणेची त्यांनी विनंती केली आहे.

३. उत्तरवादी यांना पुरेशी संधी देवून देखील त्यांनी सदर अर्जावर म्हणणे दाखल केले नाही. सबब, अर्ज विना म्हणणे चालविणेत येत आहे.

४. अपीलकार व त्यांचे विद्वान विधिज्ञ श्री.यु.बी.कुळकर्णी यांचा पुकारा करता गैरहजर. तसेच उत्तरवादी व त्यांचे विद्वान विधिज्ञ श्री.जी.जे. गिरकर यांचा पुकारा करता गैरहजर.

५. असलेली वस्तुस्थिती आणि अर्जात नमूद असलेली कारणे यांचा विचार करता अबेटमेंट रद्‌दबातल करणेच्या अर्जात दिलेले कारण हे संभाव्य आहे असे वाटते. या सर्व परिस्थितीचा विचार करता न्यायाच्या हितार्थ व वादाचे अंतिम निराकरण होण्याच्या दृष्टीने मयत उत्तरवादी क्र.८ कृष्णकुमार भगवान परूळेकर यांचे वारसांविरूध्द्‌ झालेला अबेमेंटचा आदेश रद्‌दबातल होणे आवश्यक आहे असे या न्यायालयाचे मत आहे. सबब, अर्ज मंजूर करणेस पात्र आहे. परिणामी, मी खालील प्रमाणे आदेश पारित करत आहे.

— **<u>आदेश</u>** —

१. अर्ज मंजुर करण्यात येतो.

२. मयत उत्तरवादी क्र.८ कृष्णकुमार भगवान परूळेकर यांचे वारसांविरूध्द्‌ झालेला अबेटमेंटचा आदेश नि.क्र.८७ वरील आदेशास अधिन राहून रद्‌दबातल करणेत येतो.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by Prakash Rajaram Kadam
Date: 2019.12.17 13:25:04 +0530

(पी.आर.कदम)
जिल्हा न्यायाधीश—१
सिंधुदुर्ग —ओरोस

दि.१२/१२/२०१९